**फौ.कि.अर्ज क्र. १११/२०२१**
**आरेफा कुरेशी वि. सद्दाम कुरेशी**

**निशानी क्रमांक ०२ वरील आदेश**
**(पारीत दिनांक ०२/०८/२०२२)**

१) अर्जदाराने मुळ अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १२५ अन्वये पोटगी मिळण्याकरीता दाखल केला असुन मुळ अर्जाचा निकाल होईपावेतो प्रस्तुत अर्जाद्वारे अंतरिम पोटगी दरमहा ५०००/– रुपये मिळण्याची विनंती केली या अर्जाद्वारे केली आहे.

२) अर्जदाराचा अर्ज व त्यावरील गैरअर्जदारांचे उत्तर वाचले. अर्जदारातर्फे अधिवक्ता श्रीमती एम.एन. काजी व गैरअर्जदारांतर्फे अधिवक्ता श्री. ए.एस. पौळ यांचा युक्तीवाद ऐकला.

३) दोन्ही पक्षाचे कथन व प्रतिकथन आणि प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले असता पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात आणि त्यांना मी कारणमिमांसेसह माझे निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| | **विचारार्थ मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार अंतरीम खावटी मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशत: होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

**का र ण मि मां सा**
**मुद्दा क्रमांक १ व २ करीता**

४) अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सदर कायद्यान्वये १२५ प्रमाणे

अर्ज सादर केलेला आहे तो या न्यायालयात प्रलंबीत आहे. मुळ अर्ज गणवत्तेवर निकाली निघण्यासाठी प्रकरणात वेळ लागणार आहे. म्हणून तुर्त अर्जदारास गैरअर्जदारापासून अंतरिम पोटगी मिळणे गरजेचे आहे. कारण त्याशिवाय अर्जदारांना उदरर्निवाह करणे कठीण झाले आहे. अर्जदारास कोणतेही उदरनिर्वाहाचे साधन नाही. शिवाय अर्जदार अशक्त झालेली असून औषधोपचारावर खर्च करावा लागतो. दैनंदिन गरजेची पुर्तता न झाल्यावर अर्जदाराचे हाल होतील. गैरअर्जदार हे अर्जदारांना स्वतंत्र आर्थीक सहाय्य देण्यास समर्थ आहे.

५)     अर्जदार व गैरअर्जदार हे नात्याने पती पत्नी असून त्यांचे  नाते संबंध अद्याप कायम आहे. गैरअर्जदार हा अर्जदाराकडे कायमचे दुर्लक्ष करुन अर्जदार हिस गैरअर्जदार व त्यांचे कुटुंबिय अर्जदारास वांझ आहे असे म्हणून शारिरीक व मानसिक त्रास देत असत व अर्जदारास नेहमी वांझ आहे म्हणून टोचूण बोलत असत. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराच्या वडीलांना व्यापारासाठी ५,००,०००/– रुपायांची मागणी केली, ती मागणी अर्जदाराने पुर्ण केली नसल्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदार हिस दि. ०५.०५.२०२० रोजी घराबाहेर काढले. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदारांच्या पालन पोषणाची कोणतीही चौकशी केली नाही अथवा त्यांना आर्थीक सहाय्य केले नाही म्हणून अर्जदार ही नाईलाजास्तव मौजे परतूर येथे आई वडीलांच्या घरी राहत आहे.

६)     गैरअर्जदारास अर्जदाराच्या आई वडिलांनी व नातेवाईकांनी समजावून सांगूनही अर्जदारास नांदविण्यास तयार झाला नाही. उलट अर्जदारास कधीही नांदविणार

नाही अशी धमकी दिली व गैरअर्जदाराने लोणार येथील मुलीसोबत दि. २३.०९.२०२० रोजी अर्जदाराची कुठलीही संमती न घेता गैरकायदेशीररित्या दुसरे लग्न केले.

७) मौजे जिंतूर ता. जिंतूर जि. परभणी येथे गट नं. १०८/१ मध्ये गैरअर्जदाराचे वडीलांचे नावे बागायती शेतजमीन असून गैरअर्जदार सदर शेतजमीन वहिती करत असून त्यामध्ये गैरअर्जदाराचा हिस्सा असून तो त्यापासून वर्षाकाठी खर्चवजा जाता ०४ ते ०५ लाख रुपये कमावतो. तसेच गैरअर्जदाराचा दुधाचा व्यवसाय असून गैरअर्जदाराकडे १० म्हशी आहे त्यापसून गैरअर्जदार हा ३०,०००/– रुपये मासिक उत्पन्न मिळवतो. तसेच गैरअर्जदाराचा जनावरे खरेदी विक्री व्यवसाय असून त्यापासून गैरअर्जदार हा दरमाह ३०,०००/– रुपये कमावतो. तसेच गैरअर्जदारास मौजे जिंतूर येथे तीन मजली आर.सी.सी. चे घर असून सदरील घरामध्ये ०४ रुम किरायाने दिल्या आहेत. किराया म्हणून गैरअर्जदाराला दरमहा १५,०००/– रुपये मिळतात असे एकूण ७५,०००/– रुपये दर महिन्याला गैरअर्जदाराचे उत्पन्न आहे. तसेच गैरअर्जदारावर कोणीही अवलबून नाही.

८) अर्जदार ही मुस्लीम पर्दानशिन महिला असून तिला कोणतेही व्यवसाय कौशल्ये अवगत नाही. तसेच अर्जदार ही स्वतःचा सांभाळ करण्यास असमर्थ आहे. अर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराचे पालन पोषण करणे ही गैरअर्जदाराची नैतिक जबाबदारी असून ती पार पाडण्यास गैरअर्जदाराने कसूर केला आहे. त्यामुळे गैरअर्जदार ची किमान उत्पन्न क्षमता लक्षात घेता अर्जदाराला दरमहा रूपये

५०००/– अंतरिम खावटी मंजुर करणे न्यायसंगत होईल.

९) निशाणी क्र. १३ नुसार गैरअर्जदाराने उत्तर सादर करून अर्जदार ही त्याची पत्नी असल्याचे मान्य केले. गैरअर्जदाराचे त्याच्या आईवडिल भावाशी पटत नसल्यामूळे तो त्यांच्यापासून दुर राहतो. अर्जदार हा मजूरीचे काम करत असून त्याला राहण्याकरिता स्वतःचे घर देखील नाही. तो किरायाच्या घरात राहतो. गैरअर्जदाराला स्वतःचे घर नाही, शेती नाही, उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदार किंवा त्याच्याघरच्या मंडळीने अर्जदाराचा कोणत्याही प्रकाराचा छळ केला नाही. अर्जदारास अपत्ये झाले नाही त्यामुळे ती आईवडीलांकउे राहून ईलाज करू लागली व गैरअर्जदाराला कोणतीही माहिती न देता पोटाचे ऑपरेशन केले व ती गैरअर्जदाराकर्ड नांदण्यास येत नव्हती. तसेच अर्जदाराने गैरअर्जदार व त्याच्या घरच्यांविरूद्ध कलम ४९८–अ, ३४ अन्वये खोटी फौजदारी केस केली. डॉक्टरांनी अर्जदाराला मुलबाळ होणार नाही असे सांगितले, त्यावेळी गैरअर्जदार हा सोबत होता. गैरअर्जदार आजपण अर्जदारास नांदवण्यास तयार आहे. गैरअर्जदाराची लग्नापासून खाण्यापिण्याची सोय होत नव्हती व अर्जदार त्याच्याकडे नांदण्यास येत नव्हती. त्यामुळे त्याने दुसरे लग्न केले आहे. गैरअर्जदाराची आर्थीक परिस्थीती फार गंभीर असल्यामुळे तो दुस–या पत्नीसोबत हालाखीचे जिवन जगत आहे. त्यामुळे गैरअर्जदार अर्जदाराला कोणत्याही प्रकारे पोटगी देवू शकत नाही करिता अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली.

१०) यात वाद नाही की, सध्या अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे.

जेव्हापासुन अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे, तेव्हापासुन तिच्या पालन पोषणासाठी व उदरनिवार्हासाठी गैरअर्जदार याने वेगळी व्यवस्था केली किंवा पोटगी दिली, याबाबत कोणतेही कथन केलेले नाही किंवा असे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. त्यामुळे अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची संपुर्ण जबाबदारी गैरअर्जदाराची असताना देखील त्यांने सदर जबाबदारी पार पाडण्यात कसुर केला आहे. त्यामुळे गैरअर्जदाराची किमान उत्पन्न क्षमता लक्षात घेता अर्जदाराला दरमहा रूपये २५००/– अंतरिम खावटी मंजुर करणे न्यायसंगत होईल. म्हणुन मी **मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष अंशत: होकारार्थी व मुद्दा क्रमांक २ चा निष्कर्ष नकारार्थी** नोंदवुन मुद्दा क्रमांक ३ चे उत्तराकरीता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्जदाराचा अंतरिम पोटगीचा अर्ज (निशाणी क्रमांक २) अंशत: मंजुर करण्यात येतो.

**२.** गैरअर्जदार यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराला दरमहा रूपये २५००/– अंतरीम खावटी म्हणुन अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजेच दिनांक ०३.०३.२०२१ पासुन तर मुळ अर्जाचा अंतीम निकाल लागेपावेतो द्यावे.

**३.** अर्जदार व गैरअर्जदार यांना आदेशाची प्रत विनामुल्य देण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by LILADHAR DADARAO KORDE
Date: 2022.08.03 17:43:06 +0530

ठिकाण : परतूर
दिनांक : ०२.०८.२०२२

**(लिलाधर दा. कोरडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
**परतूर**

***- : C E R T I F I C A T E : -***

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Jr. Clerk | :- | R B Dukare |
| Court Name | :- | Liladhar D. Korde,<br>Judicial Magistrate F.C.(Court No. 01),<br>Partur |
| Date of decision | :- | 02.08.2022 |
| Order signed by P.O. on | :- | 02.08.2022 |
| Order uploaded on | :- | 03.08.2022 |